# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, शिवाजीनगर पुणे 411004

दूरध्वनी क्र.:- 020 - 29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल : mscepune@gmail.com


जा.क्र. मरापप/स्विस/2024/25
दि.08/04/2024

परिपत्रक

## वाढीव सेटअपच्या ऑनलाईन मान्यतेसाठीची कार्यपद्धती

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे एप्रिल 2024 च्या टंकलेखन परीक्षेसाठी यापूर्वीच फेब्रुवारी महिन्यामध्ये विद्यार्थ्यांचे परीक्षेचे फॉर्म भरण्यासाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यामध्ये नोंदणी करताना बऱ्याच संस्थांची परीक्षार्थी बसवण्याची क्षमता संपली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मागील अनेक महिन्यांपासून या संस्थाचालकांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व विभागीय उपसंचालक यांच्याकडे अर्ज केलेले आहेत, तथापि त्यावर अद्यापही प्रक्रिया झाली नसल्याचे काही ठिकाणी आढळून आले आहे. एप्रिल 2024 मधील परीक्षा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेले असून या परीक्षा जून महिन्यात घेण्यात येणार आहेत त्यामुळे संस्थेमार्फत काही विद्यार्थ्यांच्या मागणीवरून पुनश्च 15 एप्रिल ते 25 एप्रिल 2024 या कालावधीत परीक्षेसाठी नोंदणी करून घेण्यासाठी परीक्षा परिषदेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे. वाढीव क्षमता तात्काळ मंजूर न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रवेशित होता येणार नाही व पर्यायाने विद्यार्थ्यांचे आणी परीक्षा परिषदेचे देखील नुकसान होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने संस्थाचालकांचे वाढीव संगणक सेटअप, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या तपासणीच्या अधीन राहून, तात्काळ मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

वाढीव संगणक सेटअप साठी ज्या संस्थाचालकांना अर्ज करावयाचा आहे, त्यांनी राज्य परीक्षा परिषदेतर्फे तयार करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रोग्रॅमच्या माध्यमातूनच अर्ज करावयाचा आहे. त्यासाठी अर्ज करणे, तपासणी करणे व मंजुरी देणे याबाबतची कार्यपद्धती पुढील प्रमाणे राहील-

1. वाढीव संगणक सेटअप च्या प्रोग्रामची लिंक सर्व संस्थाचालकांना त्यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.
2. ज्या संस्थाचालकांना वाढीव संगणक सेटअप साठी अर्ज करावयाचा आहे, त्यांच्याकडे त्या प्रमाणात जागा देखील उपलब्ध असणे आवश्यक आहे. वाढीव जागा उपलब्ध असेल, तरच वाढीव क्षमतेस मंजुरी देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
3. नव्याने वाढीव संगणक सेटअपला मंजुरी देताना यापुढे केवळ स्टॅन्ड अलोन(Stand Alone PC) कम्प्युटर्सनाच मंजुरी देण्यात येईल. म्हणजेच Thin Client व Extenda मधील संगणकांना अजिबात मंजुरी देण्यात येणार नाही.
4. ऑनलाइन माहिती भरताना संस्थाचालकांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेले Extenda, Thin Client किंवा Stand Alone Computers ची माहिती म्हणजेच Mac Id लिखित स्वरूपात टंकलिखित करून फाईल अपलोड करायची आहे. त्याचबरोबर जे नवीन

संगणक आपण आपल्या संस्थेमध्ये बसवले आहेत, त्यांचे देखील Mac Id स्वतंत्रपणे एका कागदावर टंकलिखित करून ते देखील तपासणी अधिकाऱ्यांना पडताळणी करता यावेत यासाठी अपलोड करावयाचे आहेत.

5. ऑक्टोबर 2023 ते एप्रिल 2024 या सत्रासाठी लघुलेखनाची परीक्षा संगणकावर घेण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. यापुढे विद्यार्थ्यांना लघुलेखनाचे प्रशिक्षण संगणकावरच द्यावयाचे असल्यामुळे लघुलेखनाची क्षमता गृहीत धरताना, संबंधित संस्था चालक यांच्याकडे किती संगणक आहेत? याची पडताळणी देखील करणे अनिवार्य असणार आहे. त्यामुळे यापुढे नूतनीकरण किंवा वाढीव सेटअप साठी क्षमतेचा एकत्रित आदेश निर्गमित करण्यात येईल व या आदेशामध्ये संगणक टंकलेखन परीक्षा व संगणक लघुलेखन परीक्षा या दोघांसाठी वेगवेगळी संख्या नमूद करून परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे संस्थाचालक यांच्याकडे जेवढे संगणक आहेत किंवा ते नवीन घेणार आहेत, त्यापैकी 6 (6x12) चे पटीत संगणक टंकलेखनासाठी आणि 3 (3ी12) चे पटीत संगणक लघुलेखनासाठी संगणक राखीव ठेवावयाचे आहेत. म्हणजेच संगणक लघुलेखानासाठी जर 3 किंवा 3 चे पटीत संगणक राखीव ठेवले असतील, तर संगणक टंकलेखनाप्रमाणेच, त्या ठिकाणी 36 किंवा 72 विद्यार्थ्यांना 12 तासांमध्ये दररोज 1 तास याप्रमाणे विद्यार्थी क्षमता निश्चित करण्यात येईल.

6. संस्थाचालकांनी संगणक टंकलेखन किंवा संगणक लघुलेखनासाठी वाढीव संगणक सेटअप स्थापित केले असतील व त्यांना परवानगी हवी असेल, तर संगणक टंकलेखनामध्ये 6 संगणकांसाठी 1 निदेशक पाहिजे, त्याप्रमाणे कार्यरत असलेल्या निदेशकाचे नाव, त्यांचा मोबाईल क्रमांक व अहर्ता नमूद करावी आणि वाढीव सेटअप साठी देखील नियुक्ती केलेल्या/करावयाच्या निदेशकाचे नाव, त्यांचा मोबाईल क्रमांक व अहर्ता नमूद करावे. हीच बाब संगणक लघुलेखानासाठी देखील लागू राहील, परंतु ती 3 संगणकांच्या पटीत असेल.

7. वाढीव संगणक सेटअप लावल्यानंतर अस्तित्वातील संगणकांचा वेगळा फोटो व नव्याने घेतलेल्या संगणकांचा वेगळा फोटो अशाप्रकारे आपले फोटो प्रोग्राम मध्ये त्या-त्या ठिकाणी अपलोड करावयाचे आहेत. जास्तीत जास्त 3 फोटो अपलोड करावेत.

8. वाढीव संगणक सेटअप ची माहिती ऑनलाईन भरताना संस्थाचालकांनी स्वतःचा फोटो, नमुना स्वाक्षरी, दैनंदिन वापर करावयाचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती देखील भरावयाची आहे.

9. वाढीव संगणक सेटअप ची माहिती यापुढे कायमस्वरूपी ऑनलाईन उपलब्ध राहणार आहे व या माध्यमातूनच यापुढे परवानगी देखील मिळणार असल्यामुळे वाढीव सेटअप साठी खालील प्रमाणे केवळ एकच वेळा (One Time Fee) प्रक्रिया शुल्क/प्रोसेसिंग फी आकारण्यात येत आहे.

    संगणक टंकलेखनाच्या वाढीव संगणक सेटअप साठी प्रत्येकी 6 संगणकांच्या सेटअपला रु.5000/- व त्या पटीत राहील. तसेच संगणक लघुलेखनासाठी प्रत्येकी 3 च्या सेटअप ला रु.2500/-व त्या पटीत प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येत आहे.

हे शुल्क संस्थाचालकांनी माहिती भरल्यानंतर तात्काळ त्याच प्रोग्राममध्ये ऑनलाइन नेट बँकिंग ने भरावयाचे आहे. फी भरल्याशिवाय आपल्या वाढीव संगणक सेटअपच्या अर्जावर कोणतीही प्रक्रिया होणार नाही.

10. संस्थाचालकांनी वरील प्रमाणे सर्व माहिती संगणकात भरल्यानंतर सबमिट केल्यापासून 48-72 तासाच्या आत (2-3 कार्यालयीन दिवस) त्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या तपासणीचे अधीन राहून मंजुरी देण्यात येईल व वाढलेल्या संगणक संख्येनुसार लगेचच संगणकीय क्षमता वाढवण्यात येईल. मंजुरी दिल्या पासून एक महिन्याचे आत शिक्षणाधिकारी यांनी संबंधित संस्थेची तपासणी करून त्याबाबतचा अभिप्राय ऑनलाइन स्वरूपात परीक्षा परिषदेकडे नोंदवावयाचा आहे.
11. सदर ऑनलाईन माहिती भरताना संस्थाचालकांनी केवळ मंगल फॉन्ट चाच वापर करावयाचा आहे.

वाढीव सेटअपच्या परवानगी दिल्यानंतर दरम्यानच्या काळामध्ये मूळ सेटअप आणि वाढीव सेटअपची तपासणी कधीही परीक्षा परिषदेतर्फे, शिक्षणाधिकारी यांचेमार्फत किंवा गोपनीय पद्धतीने तपासणी करण्यात येईल व जर तपासणीमध्ये संस्थाचालकांनी चुकीची माहिती दिल्याचे निष्पन्न झाले, तर संबंधित संस्थाचालकाविरुद्ध गंभीर स्वरूपाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामध्ये तात्काळ संस्थेची मान्यता रद्द करण्यासारखे कठोर निर्णय देखील घेण्यात येतील.

वाढीव सेटअप ची माहिती सॉफ्टवेअर/प्रोग्राम मध्ये भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रोग्रामर यांच्याशी संपर्क करावा.

1.श्री. नितीन किर्दकर मो.नं. 98604 85602. 2.श्री. विकास पवार मो.नं. 86692 89173.

**(डॉ. नंदकुमार बेडसे)**

**अध्यक्ष,**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे.**